सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २९६ | शनिवार, दि. १८ जुलै २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**

**आजचे भाव**

२४ सोने ९९.५०% : ₹ १४१३००
२२ सोने ९१.६०% : ₹ १२९९००
१८ सोने ७५.००% : ₹ १०८०००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २२३०/-
भाव प्रती १० ग्रॅम




# अमळनेरच्या दीपकनगरात गढूळ पाणीपुरवठा; नागरिकांचा पालिकेविरोधात संताप

## जलशुद्धीकरण केंद्राचे शुद्धीकरण नेमके कुठे?; आरोग्याशी खेळ होत असल्याचा आरोप


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील दीपकनगर परिसरात गुरुवार, दि. १६ जुलै रोजी सकाळी पालिकेकडून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात आला. मात्र, या पाणीपुरवठ्यावेळी नळातून गढूळ, मातीमिश्रित व अतिशय अस्वच्छ पाणी आले. त्यामुळे नागरिकांनी पालिकेविरोधात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. ही बाब अतिशय गंभीर असून, करदात्या नागरिकांच्या आरोग्याशी हा खेळ केला जात असल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे. कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेले जलशुद्धीकरण केंद्र नेमके कशा पद्धतीने पाणी शुद्धीकरण करते, असा प्रश्नही यानिमित्ताने निर्माण झाला आहे.

गुरुवारी दीपकनगर परिसरात नळातून आलेले पाणी पाहून नागरिकांना धक्काच बसला. पाण्यात मोठ्या प्रमाणात गाळ, माती आणि गढूळपणा असल्याने ते पिण्यायोग्य नसल्याचे नागरिकांनी सांगितले. अनेक घरांमध्ये भरलेले पाणी रंगाने मळकट असल्याचे दिसून आले. त्यामुळे नागरिकांनी हे पाणी पिण्यास नकार दिला. काही नागरिकांनी गढूळ पाण्याचे नमुने, तसेच व्हिडिओ आणि छायाचित्रे माध्यमांकडे पाठवून पालिकेच्या पाणीपुरवठा व्यवस्थेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

नागरिकांच्या मते पावसाळ्यात दूषित पाण्यामुळे जलजन्य व साथीच्या आजारांचा धोका वाढलेला असतो. अशा परिस्थितीत सुरक्षित व शुद्ध पाणीपुरवठा करणे ही पालिकेची मूलभूत जबाबदारी असताना गढूळ व मातीमिश्रित पाणी पुरविणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. परिणामी, नागरिकांना पाणी गाळून व उकळून वापरण्याची वेळ आली असून लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्तींच्या आरोग्याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, यासंदर्भात पालिकेचे पाणीपुरवठा सभापती कैलास पाटील यांच्याशी संपर्क साधला असता तो होऊ शकला नाही.



*अमळनेर : येथील दीपकनगर परिसरात गुरुवार, दि. १६ जुलै रोजी सकाळी पालिकेतर्फे झालेला गढूळ, मातीमिश्रित व अतिशय अस्वच्छ पाणीपुरवठा.*



*अमळनेर : येथील लायन्स क्लबतर्फे शुक्रवार, दि. १७ जुलै रोजी लायन्स हॉलमध्ये झालेल्या कार्यक्रमात ३७ तीव्र कुपोषित बालकांना पोषण आहाराचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित जळगाव जिल्हा परिषदेचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी हेमंतराव भदाणे, अमळनेर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी एन. आर. पाटील, बालविकास प्रकल्प अधिकारी प्रेमलता पाटील, लायन्स क्लबचे अध्यक्ष जितेंद्र पारख, ज्येष्ठ लायन डॉ. डिगंबर महाले, प्रोजेक्ट चेअरमन डॉ. संदीप जोशी व महेंद्र पाटील तसेच अंगणवाडी पर्यवेक्षिका व लायन सदस्य.*

# लायन्स क्लबतर्फे ३७ तीव्र कुपोषित बालकांना पोषण आहाराचे वाटप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील लायन्स क्लबतर्फे ३७ कुपोषित बालकांना पोषण आहाराचे शुक्रवार, दि. १७ जुलै रोजी लायन्स हॉलमध्ये झालेल्या कार्यक्रमात वितरण करण्यात आले. कार्यक्रमास जळगाव जिल्हा परिषदेचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी हेमंतराव भदाणे, अमळनेर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी एन. आर. पाटील, बालविकास प्रकल्प अधिकारी प्रेमलता पाटील, लायन्स क्लबचे अध्यक्ष जितेंद्र पारख, ज्येष्ठ लायन डॉ. डिगंबर महाले, प्रोजेक्ट चेअरमन डॉ. संदीप जोशी व महेंद्र पाटील तसेच अंगणवाडी पर्यवेक्षिका व लायन्स सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तालुक्यात जून २०२६ मध्ये करण्यात आलेल्या सर्वेक्षणात ३७ बालके तीव्र कुपोषित, तर २१४ बालके मध्यम कुपोषित असल्याचे समोर आल्यानंतर एका दैनिकात जुलैमध्ये प्रसिद्ध झालेल्या वृत्ताची दखल घेत येथील लायन्स क्लबने सामाजिक बांधिलकी जपत ३७ तीव्र कुपोषित बालकांना पोषण आहाराचे वितरण करण्यात आले. यावेळी प्रत्येक बालकाला २०० ग्रॅम प्रोटीन पावडर व राजगिरा लाडू देण्यात आले. तसेच दूरवरच्या ग्रामीण भागातून आलेल्या सर्व मातांना लायन सुनील चौधरी यांच्यातर्फे बसभाडे देऊन मदतीचा हात पुढे करण्यात आला.

हेमंतराव भदाणे यांनी कुपोषणाची समस्या केवळ उपचारांपुरती मर्यादित न ठेवता तिच्या मूळ कारणांवर काम करण्याची गरज असल्याचे सांगितले. गर्भधारणेपासून प्रसूतीपर्यंत माता व बालकाच्या पोषणाकडे विशेष लक्ष देणे, बालकांची पचनशक्ती वाढेल असा सकस आहार देणे तसेच कुटुंब नियोजनाबाबत जनजागृती करण्याचे आवाहन केले. तसेच लायन्स क्लबने असे सेवाभावी व्रत यापुढेही सुरू ठेवावे. ज्येष्ठ लायन डॉ. डिगंबर महाले म्हणाले, की लायन्स क्लब हा समाजातील वंचित व गरजू घटकांच्या मदतीसाठी नेहमीच तत्पर असतो. समाजसेवा हीच लायन्स क्लबची परंपरा आहे. अध्यक्ष जितेंद्र पारख यांनी भविष्यातही अशा सामाजिक उपक्रमांसाठी आवश्यक ती सर्व मदत करण्याची ग्वाही दिली.

याप्रसंगी सुनील चौधरी, दिनेश मणियार, चंद्रकांत महाजन, विजय पारख, प्रीतेश पारख, जितेंद्र जैन, महावीर पहाडे, प्रदीप जैन, प्रकाश जैन, राज जैन, रोनक दोधिवाला यांच्यासह लायन्स क्लबचे अनेक सदस्य उपस्थित होते. डॉ. मिलिंद नवसारीकर यांनी सूत्रसंचालन केले. सौ. प्रेमलताताई पाटील यांनी आभार मानले.

# विलेपार्ले-मुंबईत २५ जुलैला 'विठूनामाचा गजर'चे आयोजन

## अमळनेरकर संजय महाले यांचा पितृस्मृतिप्रित्यर्थ दर आषाढी एकादशीचा उपक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील मूळ रहिवासी असलेले तथा मुंबई महापालिकेचे निवृत्त उपायुक्त संजय महाले त्यांच्या वडिलांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दर आषाढी एकादशीला 'विठूनामाचा गजर' हा कार्यक्रम हॅप्पी लकी एन्टरटेन्मेंटच्या माध्यमातून आयोजित करतात. सिनेजगतातील एकापेक्षा एक दिग्गज गायक व वादक कलावंत त्यात सहभागी असतात. यावर्षी शनिवार, दि. २५ जुलै २०२६ रोजी महेक आणि मिहीर प्रस्तुत २४ कलाकारांचा संच असलेला 'विठूनामाचा गजर' हा कार्यक्रम मुंबईतील विलेपार्ले (पूर्व) येथील दीनानाथ नाट्यगृहात सायंकाळी ६.३० ते रात्री १०.०० या वेळेत हा कार्यक्रम होईल.

या कार्यक्रमाचे विशेष संस्मरण सुधीर फडके ऊर्फ बाबूजी यांनी केले आहे. सिनेजगतातील ख्यातनाम गायक पद्मश्री हरी हरनजी, सौरभ वखारे, सुरंजन खंडालकर, केतकी भावे-जोशी, अपूर्वा निषाद हे गीतगायन करणार असून, त्यांना शोभा आणि समूह कोरस देणार आहेत. डॉ. समीरा गुजर हे या कार्यक्रमाचे निरूपण करणार असून, अभिजीत पोहनकर संगीत संयोजक आहेत.

मिहीर महाले या कार्यक्रमाचे अंकात्मक दिग्दर्शक, निर्माती कांचन असून, निरूपण, संकल्पना, दिग्दर्शक आणि कला सहाय्य संजय महाले यांचे लाभले आहे. या कार्यक्रमाच्या तिकीट नोंदणीसाठी 'बुक माय शो' या ॲप्लिकेशनचा वापर करता येणार आहे. अशा या सुरेल आणि बहारदार भक्तीमय कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थिती देऊन आपला आनंद द्विगुणीत करण्याची सुवर्णसंधी साधावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. अनेक दर्दी अमळनेरकर या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहतात, हे विशेष!




**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!

# राष्ट्रवादी काँग्रेस व्यापारी आघाडी शहराध्यक्षपदी प्रकाश जैन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील प्रसिद्ध व्यापारी प्रकाश राजमल जैन यांची राष्ट्रवादी व्यापारी आघाडीच्या शहराध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांच्या शिफारशीनुसार राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन राजपूत यांनी सदरची नियुक्ती केली आहे. आमदार पाटील यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी शहराध्यक्ष राजपूत, कार्याध्यक्ष गोविंदा बाविस्कर, जितेंद्र ठाकूर, उपाध्यक्ष विजय पाटील, सरचिटणीस संदीप जैन, निलेश महाजन, युवक जिल्हाध्यक्ष भूषण भदाणे यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

दरम्यान, प्रकाश जैन हे अमळनेर शहरातील महावीर आईस्क्रीमचे संचालक असून, गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक कार्यात ते सक्रिय आहेत. शहरातील व्यापारी बांधवांपर्यंत राष्ट्रवादी काँग्रेसचे विचार पोहोचवून पक्षाचे संघटन वाढविण्याचा मनोदय त्यांनी याप्रसंगी व्यक्त केला.



*अमळनेर : येथील प्रसिद्ध व्यापारी प्रकाश राजमल जैन यांची राष्ट्रवादी व्यापारी आघाडीच्या शहराध्यक्षपदी निवड करण्यात आली. त्यांना या निवडीचे पत्र देताना माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील. शेजारी शहराध्यक्ष चेतन राजपूत, कार्याध्यक्ष गोविंदा बाविस्कर, जितेंद्र ठाकूर, उपाध्यक्ष विजय पाटील, सरचिटणीस संदीप जैन, निलेश महाजन, युवक जिल्हाध्यक्ष भूषण भदाणे.*

## संपादकीय

### पडताळणीचा जाच

निवडणूक आयोगाच्या म्हणण्याप्रमाणे ही प्रक्रिया घटनात्मकदृष्ट्या योग्य असली, तरी ठिकठिकाणी येणारे अनुभव पाहिले, तर अंमलबजावणीच्या पातळीवर आयोगाच्या भूमिकेवर शंका घेण्यास वाव दिसतो. त्यातच प्रक्रियेमध्ये होत असलेले नवनवे बदल या गोंधळात भरच घालत आहेत. अनेक राज्यांतील मतदारयाद्या सखोल पडताळणी मोहिमेतील (एसआयआर) अनुभव जमेस धरून महाराष्ट्रातील प्रक्रियेत सुधारणा होण्याची अपेक्षा होती; मात्र राज्यात सध्या सुरू असलेल्या प्रक्रियेतही अनेक अडचणी उद्‌भवत आहेत. त्यामुळे वर्षानुवर्षे मतदान करीत असूनही 'आपण मतदार आहोत,' हे सिद्ध करताना हजारो नागरिकांना अनेक दिव्यांमधून जावे लागत आहे. विरोधी पक्षांचे या मोहिमेबाबत आक्षेप आहेतच. यामागील राजकारण बाजूला ठेवले, तरी प्रक्रियेतील अडचणी दाखवून देणाऱ्यांना थेट मोडीत न काढता नागरिकांच्या योग्य तक्रारी समजावून घेणे आणि त्यांचे निराकरण करून ही प्रक्रिया सुटसुटीत व पारदर्शक कशी होईल, हे पाहणे सद्यःस्थितीत योग्य ठरेल. वर्षानुवर्षे अद्ययावत न केलेल्या मतदारयाद्या 'शुद्ध' करण्याच्या उद्देशाने 'एसआयआर' मोहीम हाती घेण्यात आली. आजवर या मोहिमेंतर्गत बिहारमधून ६५ लाख, पश्चिम बंगालमधून ९० लाख, तमिळनाडूमधून ७४ लाख आणि गुजरातमधून ६८ लाख नावे वगळण्यात आली. आता महाराष्ट्रासह १६ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांममध्ये या मोहिमेचा तिसरा टप्पा राबविण्यात येत आहे.

महाराष्ट्रात सध्या केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) घरोघरी जाऊन अर्जांचे वाटप करीत असले, तरी त्यांच्या अपुऱ्या संख्येमुळे अर्जांचे शंभर टक्के वितरण झालेले नाही; तसेच पावसाळ्याच्या काळात अनेक जण शेतीच्या कामांमुळे आणि हजारो जण पालखी सोहळ्यातही सहभागी झाल्याने घरी भेटलेले नसल्याचे आढळले आहे. त्यातच नव्या मतदारांनाही यादीत नाव समाविष्ट करण्याच्या अर्ज क्र. ६ च्या जोडीने 'एसआयआर'चे घोषणापत्रसुद्धा अनिवार्य केल्याची माहिती आयोगाकडून देण्यात आली आहे. त्यामुळे नवे मतदार ओळखणे आणि त्यांच्या नोंदी जुळविणे शक्य होईल आणि अर्जदारांच्या कागदपत्रांची संख्या कमी होईल, असा दावा आयोगाकडून करण्यात येत आहे. मात्र, 'एसआयआर'च्या नियमांनुसार एखाद्याच्या पालकांची नावे वगळली गेली, तर त्यांच्या पाल्यांना अर्थात नवमतदारांनाही त्याचा फटका बसणे अपरिहार्य आहे. याबाबतच्या आक्षेपांवर आयोगाने उत्तर दिलेले नाही. वर्षानुवर्षे मतदान करीत असूनही केवळ सन २००२ च्या यादीत नाव नाही, ही मतदारांची चूक कशी ठरू शकते? पूर्वीच्या पिढीत अनेकांचे जन्म घरीच झाले आहेत; त्यामुळे त्यांच्याकडे जन्मदाखले नाहीत. त्याबरोबरच ग्रामीण भागांत, झोपडपट्ट्यांमध्ये आणि भूमिहीन–भटक्या समाजांतील नागरिकांकडेही कागदपत्रे नसल्यास मतदारयादीतून त्यांची नावे वगळली जाण्याची टांगती तलवार उभी आहे. दुसरीकडे निवडणूक आयोगाचे पोर्टल आणि ॲपवरसुद्धा जुन्या यादीतील चुकीच्या नोंदींमुळे अडचणी येत आहेत.

अनेक राज्यांत या प्रक्रियेवरून वाद झाल्यानंतर संयुक्त राष्ट्रसंघानेही त्यांची दखल घेतली आणि या मोहिमेतून विशिष्ट समुदाय, स्थलांतरित मतदार आणि आर्थिक दुर्बल घटकातील मतदार मतदानापासून वंचित राहू शकतात, अशी चिंता व्यक्त केली. त्यावर 'ही मोहीम पूर्णपणे घटनात्मक व पारदर्शक असून, त्याद्वारे सर्व पात्र मतदारांचा समावेश आणि अपात्र नावे वगळण्यात येणार आहेत,' असे स्पष्टीकरण आयोगाने दिले खरे; पण आयोगाची कागदावरची ही भूमिका आणि अंमलबजावणीतील अडचणी यात जमीन–अस्मानाचे अंतर दिसते. पश्चिम बंगालमध्ये शंकास्पद बाबी आढळल्याने सुमारे तीस लाख मतदारांनी त्यावर आक्षेप घेतले होते; मात्र त्यावर सुनावणीसुद्धा न घेता सर्वोच्च न्यायालयानेही 'पुढच्या वेळी मतदान करा,' असे फर्मावले आणि त्यांना मतदानाच्या हक्कांपासून वंचित ठेवण्यात आले. अशा प्रकारांचे संयुक्त राष्ट्रांपुढे समर्थन कसे करणार? त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही सुमारे पावणेतीन कोटी मतदारांच्या मतदानाच्या हक्कावर टांगती तलवार असल्याची चर्चा आहे. त्यामुळेच मोहिमेचे उद्देश चांगले दिसले, तरी ती सुटसुटीत–पारदर्शक आणि समावेशक असल्याचे कृतीतून सिद्ध करावे लागेल; अन्यथा विरोधकांच्या प्रचाराला बळच मिळेल.

# सोने, चांदीच्या दरात पुन्हा घसरण

## खरेदीसाठी प्रतीक्षा करणाऱ्या ग्राहकांना काहीसा दिलासा




**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जळगावातील सुवर्ण बाजारपेठेत आंतरराष्ट्रीय बाजारातील घडामोडींचा परिणाम दिसून आल्यानंतर शुक्रवार, दि. १७ जुलै रोजी सोने आणि चांदीच्या दरात पुन्हा घसरण नोंदविण्यात आली. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या दरातील चढ–उतारांदरम्यान झालेल्या घसरणीमुळे दागिने खरेदीसाठी प्रतीक्षा करणाऱ्या ग्राहकांना काहीसा दिलासा मिळाला. व्यावसायिकांकडूनही खरेदीसाठी ग्राहकांची वर्दळ वाढण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

जळगावातील सुवर्ण बाजारपेठेत गुरुवार, दि १६ जुलै रोजी दिवसभरात २०६ रुपयांची किरकोळ वाढ झाल्याने २४ कॅरेट सोन्याचे दर ३ टक्के जीएसटीसह प्रति १० ग्रॅम एक लाख ४६ हजार ३६३ रुपयांपर्यंत पोहोचले होते. मात्र, शुक्रवार, दि. १७ जुलै रोजी सकाळी बाजारपेठ उघडल्यावर १,६४८ रुपयांची घट नोंदविण्यात आल्यानंतर सोने जीएसटीसह प्रति १० ग्रॅम एक लाख ४४ हजार ७१५ रुपयांपर्यंत खाली आले. त्याचप्रमाणे गुरुवार, दि. १६ जुलै रोजी दिवसभरात २,०६० रुपयांची घट झाल्याने चांदीचे दर ३ टक्के जीएसटीसह प्रति १० ग्रॅम दोन लाख सव्वीस हजार ६०० रुपयांपर्यंत खाली आले होते. शुक्रवार, दि. १७ जुलै रोजी सकाळी बाजारपेठ उघडल्यावर पुन्हा ३,०९० रुपयांची घट नोंदविण्यात आल्याने चांदी जीएसटीसह प्रतिकिलो दोन लाख तेवीस हजार ५१० रुपयांपर्यंत घसरली. चांदीत दोनच दिवसांत तब्बल ५,१५० रुपयांची घट नोंदविली गेली.

आंतरराष्ट्रीय बाजारात शुक्रवार, दि. १७ जुलै रोजी सोने आणि चांदीच्या दरामध्ये बऱ्यापैकी घसरण झाली. अलीकडील तेजीमुळे गुंतवणूकदारांनी नफा वसुली केल्याने मौल्यवान धातूंवर विक्रीचा दबाव वाढला. मात्र, पश्चिम आशियातील वाढत्या भू–राजकीय तणावामुळे सुरक्षित गुंतवणुकीचा पर्याय म्हणून सोन्याची मागणी कायम राहिल्याने घसरण मर्यादित राहिली. कॉमेक्स बाजारात सोन्याचा भाव ०.१२ टयांनी घसरून प्रति औंस ३,९८७.५० डॉलरवर आला, तर चांदीचा भाव १.२४ टक्क्यांनी घसरून प्रति औंस ५५.४९ डॉलरवर बंद झाला.

अलीकडील वाढीनंतर व्यापारी आणि गुंतवणूकदारांनी नफा वसूल करण्यास प्राधान्य दिल्याने दोन्ही धातूंमध्ये विक्री वाढल्याचे बाजार विश्लेषकांनी सांगितले. जागतिक वित्तीय बाजारातही गुंतवणूकदारांचा कल बदलताना दिसून आला. तंत्रज्ञान क्षेत्रातील समभागांमधून निधी इतर क्षेत्रांकडे वळल्याने कमोडिटी बाजारावर त्याचा परिणाम झाला. चांदी ही मौल्यवान धातू असण्याबरोबरच उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणावर वापरली जाते. त्यामुळे औद्योगिक मागणीबाबतच्या चिंतेमुळे चांदीच्या दरात सोन्याच्या तुलनेत अधिक घसरण झाली.



*अमळनेर : येथील पाचपावली देवी मंदिरासमोर सुमारे १५ दिवसांपूर्वी उन्मळून पडलेले पिंपळाचे झाड.*

# उन्मळून पडलेले पिंपळाचे झाड पंधरा दिवसांपासून 'जैसे थे'च!

**पाचपावली देवी मंदिरासमोरील प्रकार; हटविण्याची जबाबदारी नेमकी कोणाची?**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पाचपावली देवी मंदिरासमोर सुमारे १५ दिवसांपूर्वी उन्मळून पडलेले पिंपळाचे झाड अजूनही जागेवरच पडून आहे. त्यामुळे भाविकांसह स्थानिक नागरिकांची गैरसोय होत असल्याने तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे याच परिसरात नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम सुरू असतानाही संबंधित यंत्रणेकडून हे झाड हटविण्यासाठी कोणतीही ठोस कार्यवाही होताना दिसत नाही.

स्थानिकांच्या मते इतके दिवस उलटूनही संबंधित विभागाने झाड हटविण्याची जबाबदारी स्वीकारलेली दिसत नाही. त्यामुळे हे झाड हटविण्याची जबाबदारी महापालिकेची, सार्वजनिक बांधकाम विभागाची की प्रशासकीय इमारतीचे काम करणाऱ्या संबंधित यंत्रणेची, असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. नवीन प्रशासकीय इमारतीचे काम वेगाने सुरू असताना मंदिरासमोरील उन्मळून पडलेल्या झाडाकडे दुर्लक्ष होत असल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. संभाव्य अपघात टाळण्यासाठी तसेच भाविकांची गैरसोय दूर करण्यासाठी प्रशासनाने तातडीने झाड हटवून परिसर सुरक्षित करावा, अशी जोरदार मागणी भाविक आणि स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# प्रताप महाविद्यालयात 'बीबीए', 'बीसीए', 'एमसीए' प्रवेश सुरू

## ऑनलाईन कॅप नोंदणीसाठी २० जुलै अंतिम मुदत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील प्रताप महाविद्यालयात बारावी (एच.एस.सी.) विज्ञान शाखेतील पीसीएम (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित) किंवा पीसीबी (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र) गटातून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी बीबीए, बीसीए व एमसीए या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. पीसीएम किंवा पीसीबी गटातून एमएचटी–सीईटी परीक्षा दिलेल्या परंतु वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी अभ्यासक्रमांना प्रवेश मिळाला नसलेल्या अथवा वैयक्तिक कारणांमुळे त्या अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ इच्छित नसलेल्या विद्यार्थ्यांसाठी बीबीए व बीसीए हे करिअरच्या दृष्टीने उत्तम पर्याय असतो. महाराष्ट्र राज्य प्रवेश नियंत्रण कक्षामार्फत बीबीए व बीसीए अभ्यासक्रमांसाठी 'कॅप' प्रवेश प्रक्रिया सुरू असून, एमएचटी–सीईटी परीक्षेत नॉन–झीरो गुण प्राप्त केलेले पीसीएम किंवा पीसीबी गटातील विद्यार्थी या अभ्यासक्रमांसाठी पात्र आहेत. या अभ्यासक्रमांमुळे माहिती–तंत्रज्ञान, व्यवस्थापन, बँकिंग, उद्योग, कॉर्पोरेट क्षेत्र, उद्योजकता तसेच विविध शासकीय व खासगी क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या आणि करिअरच्या व्यापक संधी उपलब्ध होत असतात. बीबीए व बीसीए अभ्यासक्रमांच्या 'कॅप' नोंदणीची अंतिम मुदत सोमवार, दि. २० जुलै २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यामुळे इच्छुक विद्यार्थी व पालकांनी प्रताप महाविद्यालयात त्वरित संपर्क साधून प्रवेशासंदर्भात मार्गदर्शन, कागदपत्रांची माहिती तसेच ऑनलाइन कॅप नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन प्राचार्य प्रा. डॉ. हर्षवर्धन जाधव तसेच खानदेश शिक्षण मंडळ संचलित इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँण्ड टेक्नॉलॉजीच्या संचालिका प्रा. डॉ. वर्षाताई पाठक यांनी केले आहे. 'बीबीए'साठी प्रा. जयेश महाजन (मो. : ८३०८७८६३६८), तर 'बीसीए' प्रवेशासाठी प्रा. भाग्यश्रीताई सपकाळे (मो. : ८३८१०५६६५०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन महाविद्यालयातर्फे करण्यात आले आहे.



**अमळनेर : राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष तथा दै. 'जनवास्तव'चे संपादक चेतन राजपूत यांचा बुधवार, दि. १६ जुलै २०२६ रोजी त्यांच्या वाढदिवसानिमित्त दै. 'ग्लोबल महातेज'तर्फे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना मार्केटिंग मॅनेजर शरद कुलकर्णी, ब्युरो चीफ रजनीकांत पाटील. शेजारी मंगळग्रह सेवा संस्थेचे अकाऊंटंट योगेश पाटील, हरिष चव्हाण, सेवेकरी संजय सोनवणे व जितेंद्र साळुंखे.**

# चोरीच्या दुचाकीसह संशयित ताब्यात

## अमळनेर पोलिसांची कारवाई; पुढील कारवाईसाठी जळगावला रवाना

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील जुन्या बसस्थानक परिसरातून अमळनेर पोलिसांनी चोरीच्या दुचाकीसह (बजाज पल्सर मोटारसायकल) २२ वर्षीय तरुणाला ताब्यात घेतले. ही दुचाकी जळगाव येथील जिल्हापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतून चोरीस गेल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्यामुळे संशयितास पुढील कारवाईसाठी जिल्हापेठ पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

गुरुवार, दि. १६ जुलै रोजी पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शरद काकळीज, हवालदार मिलिंद सोनार, सुनील तेली, पोलीस शिपाई निलेश मोरे व विनोद संदानशीव हे शहरात पेट्रोलिंग करत असताना जुन्या बसस्थानक परिसरात चोरीच्या दुचाकीसह संशयित फिरत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यावरून त्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत संशयित तरुणाला काळ्या रंगाची, लाल पट्टे असलेली



***अमळनेर : शहरातील जुन्या बसस्थानक परिसरात अमळनेर पोलिसांनी गुरुवार, दि. १६ जुलै रोजी चोरीच्या दुचाकीसह ताब्यात घेतलेला संशयित उमेश पाटील.***

दुचाकीसह (एमएच १९– ईसी ६८४६) ताब्यात घेतले. त्यानंतर त्याच्याकडून संबंधित दुचाकीची कागदपत्रे मागितली असता त्याच्याकडे कोणतेही कागदपत्र नसल्याचे आढळले. तसेच चौकशीदरम्यान तो उडवाउडवीची उत्तरे देत असल्याने त्याला पोलीस ठाण्यात आणून सखोल चौकशी करण्यात आली.

तपासात ही दुचाकी जळगाव येथील जिल्हापेठ पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्र. १०७/२०२६ अन्वये दाखल असलेल्या चोरीच्या गुन्ह्यातील असल्याचे स्पष्ट झाले. संशयिताने आपले नाव उमेश प्रदीप पाटील (वय २२, रा. पिंगळवाडे, ता. अमळनेर) असे सांगितले. पोलिसांनी त्यास चोरीच्या दुचाकीसह पुढील कारवाईसाठी जिल्हापेठ पोलीस ठाण्याच्या ताब्यात दिले असून, त्याच्याकडून आणखी चोरीच्या वाहनांचा उलगडा होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, अमळनेर पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे, की परिसरात चोरीची अथवा संशयास्पद वाहने आढळल्यास तत्काळ पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल.

# मेघदूतच्या निसर्ग सौंदर्यासह कवितांचा बहारदार जागर

## संस्कृत भारती व ज्ञानराज प्रतिष्ठान यांच्यातर्फे महाकवी कालिदास दिनानिमित्त कार्यक्रम



***अमळनेर : येथील संस्कृत भारती व ज्ञानराज प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने महाकवी कालिदास दिनानिमित्त टाऊन हॉलमध्ये 'पावसाळी कविता व मेघदूतातील निसर्गदर्शन' या विषयावर विविध शाळांतील विद्यार्थिनींचा विशेष कार्यक्रम झाला. याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना संस्कृत शिक्षक संजय पिले. व्यासपीठावर द्रौ. रा. कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. एस. एस. सूर्यवंशी, सुधीर टाकणे, सौ. राहणे व सौ. बागूल व प्रा. डॉ. प्रभाकर जोशी.***

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील संस्कृत भारती व ज्ञानराज प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने महाकवी कालिदास दिनानिमित्त टाऊन हॉलमध्ये 'पावसाळी कविता व मेघदूतातील निसर्गदर्शन' या विषयावर विशेष कार्यक्रम झाला. द्रौ. रा. कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. एस. एस. सूर्यवंशी अध्यक्षस्थानी होत्या. जळगाव येथील संस्कृत शिक्षक संजय पिले प्रमुख वक्ते होते. त्यांनी महाकवी कालिदास यांच्या साहित्याचा परामर्श घेत मेघदूत काव्यातील प्रणयभावना, निसर्गसौंदर्य आणि मंदाक्रांता वृत्ताचे वैशिष्ट्य प्रभावीपणे उलगडून सांगितले.

प्रारंभी सुधीर टाकणे यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. त्यानंतर द्रौ. रा. कन्या शाळेतील विद्यार्थिनींनी 'कालिदास अष्टक' सादर करून वातावरण संस्कृतमय केले. त्यानंतर 'हसरा नाचरा श्रावण आला' हे गीत व 'रंगारी श्रावण' ही कविता सादर करण्यात आली. या सादरीकरणासाठी सौ. प्रज्ञा जोशी यांनी मार्गदर्शन केले.

जी. एस. हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी 'कालिदास जने जने' हे संस्कृत गीत सादर केले. ग्लोबल स्कूलच्या विद्यार्थिनींनी 'सरसर आयान्ति वर्षाधाराः' हे संस्कृत गीत सादर केले. त्यांना देवयानी भावसार यांनी मार्गदर्शन केले. तसेच सेंट मेरी स्कूलच्या विद्यार्थिनींनी 'श्रावणमासी हर्ष मानसी' ही कविता सादर केली. त्यांना सौ. राहणे व सौ. बागूल यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास नववी–दहावीतील संस्कृत विषयाच्या विद्यार्थ्यांसह संस्कृतप्रेमी रसिकांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. यावेळी प्रा. डॉ. प्रभाकर जोशी यांनी संस्कृतप्रेम विद्यार्थ्यांमध्ये वृद्धिंगत व्हावे तसेच नव्या पिढीला संस्कृत साहित्याचा परिचय व्हावा, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे मत व्यक्त केले. भावेश्री जोशी यांनी आभार मानले.

# पावसाळ्यात वीज खांबापासून राहा चार हात दूर, घरातही काळजी घ्या!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : पावसाळ्यात मुसळधार पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे विजेच्या तारा तुटणे, खांब कोसळणे, रोहित्रांमध्ये बिघाड किंवा वीज प्रवाहित होऊन करंट उतरणे आदी दुर्घटना घडण्याची शक्यता असते. तसेच सगळीकडे ओल आलेली असल्याने विद्युत बटण, उपकरणे वापरताना काळजी घ्यायला हवी.

**ग्राहक सेवा केंद्राशी संपर्क साधा**

ट्रान्सफॉर्मर मधील बिघाड किंवा इतर कोणतीही धोकादायक बाब दिसल्यास त्वरित महावितरण कार्यालयाशी किंवा ग्राहक सेवा केंद्राशी संपर्क साधा. टोल फ्री क्रमांक १९१२, १९१२०, १८००–२१२–३४३६ वा १८००–२३३–३४२५ या क्रमांकावर संपर्क साधा असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

**वायरिंगची तपासणी गरजेची**

घरातील वायरिंगची तपासणी करून घ्या. जुनी, सैल किंवा खराब झालेली वायरिंग, प्लग, स्विच व एम सीबी याची वेळोवेळी तपासणी करून दुरुस्ती करून घ्या. परवाना विद्युत तंत्रज्ञानांची मदत घ्या. आर्थिंग तपासा. आर्थिंग असल्यास विद्युत धक्का बसण्याचा धोका कमी असतो.

**वायरवर कपडे वाळवू नका**

कपडे वाळविण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या विजेच्या तारांचा वापर करू नका. तसेच विजेच्या खांबाला चिकटून उभे राहाणे, त्याला जोडून एखादे वाहन ठेवणे टाळा. विजेवर चालणाऱ्या कोणत्याही वस्तूला पाणी तर लागत नाही ना याची खात्री करून घ्या.

**पाणी साचलेल्या ठिकाणी जपून**

पाणी साचलेल्या ठिकाणी विशेष काळजी घ्या. वीज खांब, ट्रान्सफॉर्मर, वितरण पेटी किंवा स्ट्रीट लाइट जवळ पाणी साचले असल्यास त्या परिसरात जाणे टाळण्याचे आवाहन केले आहे.

**जिवंत तारा पडण्याच्या घटनांत वाढ**

पावसाळ्यात सोसाट्याच्या वाऱ्याने विजेचे खांब पडतात. रोहित्र नादुरुस्त होते. विजेच्या तारा पडतात. पावसाळ्यात जिवंत तारा पडण्याच्या घटना घडत असतात. तुटलेल्या वीजवाहिन्यांपासून दूर राहा. ओल्या हाताने स्पर्श करू नका अशा सूचना महावितरण तर्फे देण्यात आल्या आहेत.

**विजेच्या दुर्घटनांचा वाढता धोका**

पावसाळा सुरू झाला की विजेच्या दुर्घटनांचा धोका वाढला जातो. विद्युत उपकरणांची, विद्युत वायरिंगची नीट पाहणी करून घेणे आणि गरज वाटल्यास त्याची लगेचच दुरुस्ती करणे. कारण या दिवसांत घराच्या भिंतींमध्ये ओल मुरते. त्यामुळे विजेचा शॉक बसण्याच्या कित्येक घटना घडतात. या घटनांमध्ये कित्येकांचा जीवही जातो. त्यामुळेच पावसाळ्याच्या सुरुवातीलाच काही गोष्टींची खबरदारी घेणे खूप गरजेचे आहे

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



# ७०० टन कचरे और खच्चरों के गोबर से बिजली...

## अमरनाथ यात्रा बनेगी भारत की सबसे बडा ग्रीन मॉडल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमरनाथ यात्रा-२०२६ को इस बार पर्यावरण संरक्षण की दिशा में नई पहचान देने की तैयारी की गई है। जम्मू-कश्मीर प्रशासन ने इस वर्ष की यात्रा को देश की पहली 'जीरो लैंडफिल पिलग्रिमेज' बनाने का लक्ष्य तय किया है। ३ जुलाई से शुरू होकर २८ अगस्त तक चलने वाली इस यात्रा में लाखों श्रद्धालुओं के शामिल होने की उम्मीद है। इसके बावजूद यात्रा के दौरान निकलने वाले कचरे को लैंडफिल में भेजने के बजाय वैज्ञानिक तरीके से संसाधनों में बदला जाएगा। प्रशासन के अनुसार यात्रा मार्ग पर निकलने वाले ठोस और तरल कचरे का अलग-अलग संग्रह और वैज्ञानिक प्रसंस्करण किया जा रहा है। प्लास्टिक कचरे को कम करने के लिए विभिन्न स्थानों पर वाटर एटीएम लगाए गए हैं, जबकि खच्चरों के गोबर से बायोगैस तैयार की जाएगी। इस पूरे अभियान का संचालन स्वाहा रिसोर्स मैनेजमेंट और जम्मू-कश्मीर के ग्रामीण स्वच्छता विभाग की ओर से किया जा रहा है।

**७०० टन तक कचरे के प्रबंधन की तैयारी**

यात्रा के दौरान करीब ४०० से ७०० मीट्रिक टन कचरा निकलने का अनुमान है। इसके लिए बालटाल और पहलगाम दोनों मार्गों पर पर्याप्त संख्या में डस्टबिन लगाए गए हैं। साथ ही करीब ४,००० सफाई कर्मचारी और ६२३ कचरा प्रबंधन कर्मी पूरे यात्रा मार्ग पर तैनात किए गए हैं, जो नियमित रूप से कचरा एकत्र कर उसका वैज्ञानिक निस्तारण कर रहे हैं।

**पहले दिन से जारी है सफाई अभियान**

ग्रामीण स्वच्छता विभाग की महानिदेशक अनु मल्होत्रा के अनुसार, यात्रा शुरू होने के पहले दिन से ही सफाईकर्मी लगातार कचरा एकत्र कर रहे हैं। हाई-एंड मशीनों की मदद से उसका वैज्ञानिक प्रसंस्करण किया जा रहा है, ताकि पर्यावरण संरक्षण के साथ स्वच्छ और टिकाऊ तीर्थयात्रा का लक्ष्य हासिल किया जा सके।

**खच्चरों के गोबर से बनेगी बायोगैस**

यात्रा मार्ग पर रोजाना चलने वाले २५ से ३० हजार खच्चरों के गोबर के प्रबंधन के लिए पहली बार विशेष मशीनें लगाई गई हैं। गोबर को एकत्र कर ५ घन मीटर क्षमता वाले बायोगैस प्लांट में भेजा जा रहा है, जहां उससे मीथेन गैस और ग्रीन फ्यूल तैयार किया जाएगा। इससे यात्रा मार्ग पर गंदगी भी कम होगी और पशु अपशिष्ट का बेहतर उपयोग भी हो सकेगा।

**मीथेन से जलने वाला लैंप बना आकर्षण**

बालटाल प्रदर्शनी केंद्र में मीथेन गैस से चलने वाला विशेष लैंप लगाया गया है। यहां आने वाले श्रद्धालु खच्चरों के गोबर से तैयार की गई ऊर्जा का प्रत्यक्ष प्रदर्शन देख सकते हैं। इस तकनीक का उद्देश्य पशु अपशिष्ट को ग्रीन फ्यूल में बदलना और यात्रा मार्ग को स्वच्छ बनाए रखना है।





**प्लास्टिक पर सख्ती, लगाए गए ८ वाटर एटीएम**

प्लास्टिक प्रदूषण रोकने के लिए यात्रा मार्ग पर आठ वाटर एटीएम लगाए गए हैं। प्रत्येक एटीएम हर १२ घंटे में करीब ६,००० लीटर पीने का पानी उपलब्ध कराता है। इससे प्रतिदिन लगभग ५० हजार प्लास्टिक की बोतलों और पूरी यात्रा के दौरान करीब ३० लाख प्लास्टिक की बोतलों के उपयोग को रोका जा सकेगा।

**डेढ़ लाख कपड़े के थैले किए गए तैयार**

यात्रा में सिंगल यूज प्लास्टिक पर पूरी तरह प्रतिबंध लगाया गया है। अगर कोई श्रद्धालु प्लास्टिक बैग लेकर पहुंचता है तो उसे आधार शिविर से आगे ले जाने की अनुमति नहीं होगी। ऐसे यात्रियों को करीब १.५ लाख कपड़े के थैले मुफ्त उपलब्ध कराए जा रहे हैं। इसके अलावा भंडारों और दुकानदारों को भी स्टील की प्लेट, गिलास और अन्य पुनः उपयोग योग्य बर्तनों का इस्तेमाल करने के निर्देश दिए गए हैं।

**नुक्कड़ नाटक और कठपुतली शो से किया जा रहा जागरूक**

श्रद्धालुओं में पर्यावरण संरक्षण के प्रति जागरूकता बढ़ाने के लिए यात्रा मार्ग पर बने भंडारों में नुक्कड़ नाटक, कठपुतली शो और जागरूकता अभियान चलाए जा रहे हैं। यात्रियों से अपील की जा रही है कि वे अपने साथ स्टील की थाली, कटोरी और चम्मच रखें तथा प्लास्टिक की जगह कपड़े के बैग का उपयोग करें।

**सस्टेनेबल तीर्थयात्रा का बनेगा नया मॉडल**

कचरा प्रबंधन का जिम्मा संभाल रही संस्था के सीईओ डॉ. समीर शर्मा ने कहा कि यदि 'जीरो-लैंडफिल अमरनाथ यात्रा' का यह मॉडल सफल रहता है, तो यह देश में सस्टेनेबल तीर्थयात्रा प्रबंधन की दिशा में एक बड़ा मील का पत्थर साबित होगा। उन्होंने कहा कि श्रद्धालुओं को यह समझना चाहिए कि वे केवल दर्शन के लिए नहीं, बल्कि एक स्वच्छ और हरित यात्रा का हिस्सा बनने के लिए भी आ रहे हैं। इसलिए सभी को कचरा न फैलाने और पर्यावरण संरक्षण में सहयोग करना चाहिए।
प्रधानमंत्री मोदी ने भी की थी अपील प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ने भी अमरनाथ यात्रा शुरू होने पर श्रद्धालुओं को शुभकामनाएं देते हुए अपील की थी कि वे यात्रा के दौरान कचरा न फैलाएं और पर्यावरण संरक्षण को प्राथमिकता दें। उन्होंने सभी यात्रियों से स्वच्छ और हरित अमरनाथ यात्रा को सफल बनाने में सहयोग करने का आग्रह किया।

# डायबिटीस रुग्णांसाठी HbA1c चाचणी का आवश्यक?


## तज्ज्ञांनी दिला इशारा, दुर्लक्ष करू नका कारण...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मधुमेहाचे वाढते प्रमाण लक्षात घेता रक्तातील साखरेवर दीर्घकालीन नियंत्रण ठेवण्यासाठी HbA1c चाचणी अत्यंत निर्णायक ठरत आहे, असा सल्ला आरोग्यतज्ज्ञांनी दिला आहे.

**डायबिटीस रुग्णांसाठी HbA1c चाचणी का आवश्यक?**

बहुतेक लोकांना माहीत आहे, की रक्तातील साखर नियंत्रणात ठेवल्याने हृदय, डोळे आणि मूत्रपिंडांचे संरक्षण होते. तसेच स्वादुपिंडाच्या कर्करोगापासून संरक्षण करण्यासाठी रक्तातील साखरेवर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. मधुमेह नियंत्रणासाठी HbA1c ही तपासणी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. HbA1c चाचणीमुळे मागील २ ते ३ महिन्यांतील रक्तातील साखरेची सरासरी पातळी समजण्यास मदत होते. तज्ज्ञांच्या मते HbA1c नियंत्रणात ठेवल्यास मधुमेहामुळे होणाऱ्या हृदयविकार, मूत्रपिंडाचे आजार, डोळ्यांचे विकार आणि मज्जासंस्थेच्या समस्या टाळता येऊ शकतात. योग्य HbA1c पातळी असल्यास रुग्ण अधिक सक्रिय, तणावमुक्त आणि दर्जेदार जीवन जगू शकतो. मात्र या पातळीमध्ये सातत्याने वाढ होत राहिल्यास जीवनमानावर गंभीर परिणाम होऊ शकतात.
HbA1c नियंत्रणासाठी संतुलित आहार, नियमित व्यायाम, वजन नियंत्रणात ठेवणे, औषधांचे नियमित सेवन करणे आणि वेळोवेळी आरोग्य तपासण्या करणे गरजेचे आहे. तज्ज्ञांनी दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केल्यास मधुमेह प्रभावीपणे नियंत्रणात ठेवता येतो, असेही तज्ज्ञांनी स्पष्ट केले.
ज्या लोकांची HbA1c पातळी ७ टक्क्यांपेक्षा कमी असते त्यांना उच्च पातळी असलेल्या लोकांच्या तुलनेत स्वादुपिंडाचा कर्करोग होण्याची शक्यता कमी असते. तुमची HbA1c पातळी प्रत्येक १ टक्क्याने वाढल्यास तुमच्या स्वादुपिंडाला असलेला धोका जवळपास ५० टक्क्यांनी वाढतो. योग्य HbA1c पातळी ही तुमच्या शरीराचे 'संरक्षण' करते, अशी प्रतिक्रिया डॉ. चंद्रशेखर तुलसीगेरी (संचालक, क्रिटिकल केअर विभाग आणि प्रमुख ए अँड ई, न्यूईरा हॉस्पिटल, वाशी, नवी मुंबई) यांनी व्यक्त केली.



HbA1c ७ टक्क्यांपेक्षा कमी आणि उपाशीपोटी रक्तातील साखर १२६ mg/dL (७ mmol/L) किंवा त्यापेक्षा कमी राहील याची खबरदारी घ्या. ही साध्य केल्यास तुमच्या शरीराला जास्तीत जास्त संरक्षण मिळते. तुमच्या डॉक्टरांना तुमच्या HbA1c पातळीबद्दल आणि ती ७ टक्क्यांच्या जवळ आणण्यासाठी कोणती पावले उचलावीत याबद्दल विचारा. मधुमेहाचे व्यवस्थापन करणे म्हणजे केवळ 'गुंतागुंत' टाळणे नाही; तर ते तुमच्या जीवनाचे संरक्षण करण्याचा आणि कर्करोग सुरू होण्यापूर्वीच तो टाळण्याचा एक सक्रिय मार्ग आहे. तुमची HbA1c पातळी प्रभावीपणे कमी करण्यासाठी, 'ग्लुकोजमधील अचानक वाढ' टाळणाऱ्या सवयींवर लक्ष केंद्रित करणे सर्वोत्तम आहे. जेव्हा तुम्ही ही वाढ टाळता तेव्हा तुमची एकूण सरासरी (HbA1c) नैसर्गिकरित्या कमी होते, असे डॉ. निशांत तावडे ( फॅमिली मेडिसीन, न्यूईरा हॉस्पिटल, वाशी, नवी मुंबई) यांनी स्पष्ट केले.

**डॉ. चंद्रशेखर तुलसीगेरी खाण्याच्या सवयींवर प्रकाश टाकताना सांगतात-**

**'परिपूर्ण ताट' हवे**

तुमचे अर्धे ताट हे स्टार्च नसलेल्या भाज्यांनी (पालक, ब्रोकोली, सिमला मिरची), एक चतुर्थांश प्रथिने आणि एक चतुर्थांश कर्बोदकांचा समावेश असलेले हवे.

**तुमच्या जेवणाचा क्रम ठरवा**

आधी फायबर आणि प्रथिनांचे सेवन करा आणि कर्बोदकांचे सेवन हे जेवणाच्या शेवटी करा. कारण यामुळे रक्तामध्ये साखर शोषली जाण्याची प्रक्रिया मंदावते.

**हळूवारपणे पचणारी कर्बोदके निवडा**

पांढरा ब्रेड, भात आणि साखरयुक्त पदार्थांच्या जागी ओट्स, क्विनोआ, मसूर आणि तृणधान्यांसारखे पर्याय निवडा.

**द्रवस्वरूपातील साखर टाळा**

सोडा, चहा आणि फळांच्या रसांऐवजी पाणी, सोडा वॉटर किंवा साखर नसलेला हर्बल चहा प्या.

**जेवणानंतर १० मिनिटे चाला**

जेवणानंतर केवळ १० मिनिटे चालल्याने तुमच्या रक्तातील अतिरिक्त साखर वापरली जाते आणि स्नायूंना ऊर्जा मिळते.

**कार्डिओ आणि स्ट्रेंथ ट्रेनिंग व्यायाम करा**

दर आठवड्याला १५० मिनिटे वेगाने चालण्याचे ध्येय ठेवा. पण त्यात २ दिवस प्रतिकारशक्ती वाढविणारे व्यायाम करा.

**दीर्घकाळ एकाच जागी बसणे टाळा**

दर तासाला २ मिनिटांसाठी उभे राहून स्ट्रेचिंग करण्याची सवय लावा.
डॉ. निशांत तावडे सांगतात, की ७-८ तास पुरेशी झोप घ्या- झोपेच्या कमतरतेमुळे कोर्टिसोल वाढतो. ज्यामुळे तुमचे शरीर इन्शुलिनला प्रतिरोधक बनते आणि रक्तातील साखर वाढवते.

**तणावाचे व्यवस्थापन करा**

जास्त तणावामुळे शरीरात साठवलेली साखर रक्तात सोडली जाते. जेव्हा तुम्हाला खूप तणाव जाणवतो तेव्हा २ मिनिटे दीर्घ श्वास घेण्याचा प्रयत्न करा.

**शरीरात पाण्याची पातळी योग्य राखा**

निर्जलीकरणामुळे तुमच्या रक्तातील साखर अधिक केंद्रित होते. पुरेसे पाणी प्यायल्याने तुमच्या मूत्रपिंडांना अतिरिक्त ग्लुकोज बाहेर टाकण्यास मदत होते.

# भाड्याचे घर अन् १० हजारांच्या पगारातून सुरूवात!

**सक्सेस स्टोरी**

## आज तब्बल ४०० कोटींच्या कंपनीचे मालक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपणास विश्वास बसणार नाही की एका व्यक्तीने १० हजार रुपयांच्या पगाराने करियरची सुरूवात केली आणि आज तब्बल ४०० कोटी रुपयांच्या कंपनीचे ते मालक आहे. भारतातील ब्रॉडबँड सेवा क्षेत्रात 'एक्सायटेल' हे नाव वेगाने लोकप्रिय होत आहे. किफायतशीर इंटरनेट प्लॅन्स आणि वाढत्या ग्राहकवर्गामुळे कंपनीने अल्पावधीतच स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. या यशामागे आहेत कंपनीचे संस्थापक विवेक रैना, ज्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत कोट्यवधी रुपयांचा व्यवसाय उभा केला.

**घर सोडून नव्याने सुरुवात**

विवेक रैना यांचा जन्म जम्मू-काश्मीरमधील श्रीनगर येथे झाला. मात्र १९९० च्या दशकात काश्मीरमधील अस्थिर परिस्थितीमुळे त्यांच्या कुटुंबाला आपले घर सोडून स्थलांतर करावे लागले. एकेकाळी १४ खोल्यांच्या प्रशस्त घरात राहणाऱ्या कुटुंबाला नंतर भाड्याच्या घरात राहण्याची वेळ आली. या कठीण काळातही त्यांच्या पालकांनी शिक्षणाला प्राधान्य दिले. त्यामुळे अनेक अडचणींचा सामना करत विवेक यांनी आपले शिक्षण पूर्ण केले आणि पुढे एमबीएची पदवी मिळविली.

**१० हजारांच्या नोकरीतून करिअरची सुरूवात**

आपले शिक्षण पूर्ण झाल्यानंतर विवेक यांना ब्रॉडबँड सेवा पुरविणाऱ्या 'हाथवे' कंपनीत पहिली नोकरी मिळाली. त्यावेळी त्यांचा मासिक पगार फक्त १० हजार रुपये होता. या नोकरीतून त्यांनी इंटरनेट आणि दूरसंचार क्षेत्रातील बारकावे शिकून घेतले. यानंतर त्यांनी रिलायन्स, ब्रॉडबँड पेसनेट आणि डिजिकेबलसारख्या कंपन्यांमध्ये विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या. या अनुभवामुळे त्यांना उद्योग क्षेत्रातील संधी आणि आव्हाने जवळून समजली.

**२०१५ मध्ये स्वतःची कंपनी**


नोकरी करत असतानाच स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचे स्वप्न विवेक यांच्या मनात होते. अखेर २०१५ मध्ये त्यांनी काही परदेशी उद्योजकांच्या सहकार्याने 'एक्सायटेल' या ब्रॉडबँड कंपनीची स्थापना केली. दिल्ली येथे मुख्यालय असलेली ही कंपनी आज देशातील अनेक शहरांमध्ये इंटरनेट सेवा पुरवते. किफायतशीर दरात हाय-स्पीड फायबर ब्रॉडबँड उपलब्ध करून देण्यावर कंपनीचा भर आहे.

**४०० कोटींचा व्यवसाय**

'एक्सायटेल' ने गेल्या काही वर्षांत झपाट्याने वाढ नोंदवली आहे. कंपनी आज देशातील ३० हून अधिक शहरांमध्ये सेवा देते. लाखो ग्राहकांना हाय-स्पीड फायबर इंटरनेट सुविधा पुरविणाऱ्या या कंपनीचा वार्षिक व्यवसाय सुमारे ४०० कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्याचे सांगितले जाते.

**संघर्षातून उभे राहिलेले यश**

घरदार सोडण्याची वेळ, आर्थिक अडचणी आणि करिअरच्या सुरूवातीला मिळणारा कमी पगार अशा अनेक संकटांचा सामना करून विवेक रैना यांनी यशाचे शिखर गाठले. त्यांचा प्रवास हे दाखवून देतो की जिद्द, सातत्य आणि योग्य दृष्टिकोन असेल तर कोणतीही प्रतिकूल परिस्थिती यशाच्या आड येऊ शकत नाही.



# गव्हाच्या पिठाचे आंबा मोदक...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मोदक म्हटले, की डोळ्यांसमोर सर्वांत आधी उकडीचे मोदकच येतात. पण प्रत्येक वेळी परंपरेला थोडेसे वेगळे वळण दिले, तर त्यातूनही एखादी भन्नाट चव जन्माला येते. मला गव्हाच्या पिठाचे मोदक अगदी सुबक जमतात. पण तांदळाच्या पिठाचा अजून माझा आणि त्याचा फारसा मेळ बसलेला नाही. त्यावर अजून प्रयोग सुरूच आहेत. एक दिवस त्यांनाही वठणीवर आणेनच.

रेसिपी अगदी सोपी आहे. मोदकासाठी आतलं सारण नेहमीप्रमाणे ओल्या खोवलेल्या नारळाचे आणि गुळाचे बनवून घेतले. पण खरी गंमत कणकेत केली. पाणी न वापरता थेट गोड, रसाळ आंब्याचा पल्प घालून कणिक मळली. त्यामुळे मोदकांना हलकीशी आंब्याची चव आणि सुंदर नैसर्गिक रंग दोन्ही मिळाले. नंतर प्रेमाने मोदक घडवले, मस्त वाफवून घेतले आणि सर्वांत आधी बाप्पाला नैवेद्य दाखविला.



मोदक इतके लुसलुशीत झाले होते, की एक संपायच्या आत दुसऱ्यावर हात जात होता. आणि आमचे शंभूराव... त्यांनी तर पहिलाच घास घेतला आणि नुसते हसून बघितले. ते हसू म्हणजे 'हे पुन्हा कर...' याचीच पावती होती. स्वयंपाकात कधी-कधी छोटासा बदलही एखाद्या पदार्थाला वेगळी ओळख देऊन जातो. हे आंबा मोदक त्याचे जीवंत उदाहरण आहेत.

# ब्राऊन ब्रेड खरोखर हेल्दी असतो का?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अनेकांना वाटते की व्हाईट ब्रेडपेक्षा ब्राऊन ब्रेड आरोग्यदायी आहे. पण त्यामागचे सत्य जाणून घेणे आवश्यक आहे. ब्राऊन ब्रेड सामान्यतः गव्हाच्या पिठापासून (आटा) बनविला जातो. ज्यामध्ये मैद्याच्या तुलनेत जास्त फायबर असते. फायबरमुळे पचन सुधारते आणि रक्तातील साखर नियंत्रित राहण्यास मदत होते, जो ब्राऊन ब्रेडचा एक मुख्य फायदा आहे. मात्र, सावधान! बाजारात मिळणाऱ्या सर्वच ब्राऊन ब्रेडमध्ये खरोखर गहू असतोच असे नाही.

अनेक कंपन्या पांढऱ्या ब्रेडला तपकिरी रंग देण्यासाठी 'कॅरामल कलर'चा वापर करतात, जो आरोग्यासाठी तितकासा चांगला नसतो. तज्ज्ञांच्या मते खरेदी करताना पॅकेटवरील घटक तपासा आणि त्यात '१०० टक्के होल व्हीट' असल्याचे सुनिश्चित करा.

ज्याप्रमाणे पावसाळ्यात टायफॉइड आणि कॉलरा टाळण्यासाठी स्वच्छ अन्नाची गरज असते, तसेच रोजच्या आहारात शुद्ध घटकांची निवड करणे महत्त्वाचे आहे. १०० टक्के गव्हाचा ब्राऊन ब्रेड्र असेल तरच तो हेल्दी आहे, अन्यथा तो केवळ मैदा असू शकतो.


शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# हनुमानजींच्या भक्तांवर शनीदेवांचा प्रकोप का होत नाही?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एकदा महावीर हनुमानजी प्रभू श्रीरामचंद्रांच्या काही कामात व्यस्त होते. शनी भगवान त्या ठिकाणाहून जात होते. वाटेत त्यांना हनुमानजी दिसले. शनीदेवांनी स्वभावानुसार हनुमानजींच्या कार्यामध्ये बाधा आणण्याचे ठरविले. हनुमानजींनी शनीदेवांना सावध केले आणि त्यांना तसे करण्यापासून रोखले. पण शनीदेवांनी हे मान्य केले नाहीत. त्यानंतर हनुमानजींनी शनीदेवांना आपल्या शेपटीने गुंडाळले आणि पुन्हा प्रभू श्रीरामचंद्रांचे कार्य करू लागले. कामाच्या दरम्यान ते इकडे-तिकडे फिरत होते, उड्या मारत होते. त्यामुळे शनीदेवांला अनेक जखमा झाल्या. शनीदेवांनी खूप प्रयत्न केले. पण त्यांना हनुमानजींच्या बंदिवासातून मुक्त करता आले नाही. त्यांनी विनंती केली, पण हनुमानजी आपल्या कामात मग्न होते.

प्रभू श्रीरामचंद्रांचे काम संपल्यावर हनुमानजींना शनीदेवांचा विचार आला आणि मग त्यांनी शनीदेवांना मुक्त केले. शनीदेवांना त्यांची चूक कळाली आणि त्यांनी हनुमानजींची माफी मागितली, की ते प्रभू श्रीराम आणि हनुमानजींच्या कार्यात कधीही अडथळा आणणार नाहीत आणि श्रीराम आणि हनुमानजींच्या भक्तांना त्यांचा विशेष आशीर्वाद मिळेल.

शनीदेवांनी भगवान श्री हनुमानजींकडून मोहरीचे तेल मागितले जे ते त्यांच्या जखमांवर लावू शकतील आणि जखमांपासून लवकर बरे होऊ शकतील. हनुमानजींनी ते तेल त्यांना उपलब्ध करून दिले आणि अशा प्रकारे शनीदेवांच्या जखमा बऱ्या झाल्या. तेव्हा शनीदेव म्हणाले, की या स्मरणार्थ जो कोणी भक्त शनिवारी माझ्यावर मोहरीचे तेल अर्पण करेल त्याला माझा विशेष आशीर्वाद मिळेल.



### दुसरी पौराणिक कथा

अहंकारी लंकापती रावणाने शनीदेवांना कैद करून लंकेतील तुरुंगात टाकले. हनुमानजी लंकेत पोहोचेपर्यंत शनीदेव त्याच तुरुंगात कैद राहिले. जेव्हा हनुमानजी माता सीतेच्या शोधात लंकेत आले, तेव्हा माता जानकींचा शोध घेत असताना त्यांना भगवान शनीदेव तुरुंगात कैद झालेले आढळले. त्यानंतर हनुमानजींनी शनीदेवांना मुक्त केले. मुक्त झाल्यानंतर त्यांनी हनुमानजींचे आभार मानले आणि त्यांच्या भक्तांवर विशेष कृपा ठेवण्याचे वचन दिले.

# शनीदेव आणि हनुमानजी यांची मंदिरे जोडून का असतात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शनी आणि हनुमानजींची मंदिरे नेहमी जवळजवळ असतात. किंबहुना काही ठिकाणी एकाच मंदिरात या दोन्ही देवांच्या मूर्ती शेजारी असतात. शनी व हनुमानजी या दोघांचेही स्वरूप उग्र आहे. वात हे त्यांचे तत्त्व आहे. दोघांचेही जन्म उष्ण वायूपासून झाले आहेत.

शनी आणि हनुमानजींच्या ठिकाणी रुद्रांश आहे. शनी हा वैष्णवी शक्तीचे कार्य करीत असलेला रुद्रांश आहे, तर हनुमानजी हा फक्त रुद्रांशच आहे. या दोघांचे जन्मवार तर एक आहेतच पण इतकेच नव्हे, तर आवडीनिवडीही सारख्या आहेत. त्या दोघांनाही गोडेतेल, रुई, उडीद इत्यादी वस्तू प्रिय आहेत. शनी हा हनुमानजींप्रमाणेच ऋजू स्वभावाचा भक्तांना वैभव प्राप्त करून देणारा आहे, पण ज्याचे त्याच्याशी वैर होते त्याला तो हनुमानजींप्रमाणे पीडा देतो. शनी आणि हनुमानजी दोघेही वैराग्यमूर्ती आहेत. शनी व हनुमानजी यांचे उपासक शनिवार पाळतात आणि एकाच प्रकारचा पूजोपचार दोघांना समर्पित करतात.

शनी हे सूर्याचे पुत्र आहेत, तर हनुमाजी हे सूर्याचे शिष्य आहेत. म्हणून शनीची पीडा दूर करण्यासाठी हनुमानजींची उपासना करतात. शनी आणि हनुमानजी या दोघांमध्ये इतके साम्य आढळण्याची कारणे पुढील कथांमध्ये दिसतात.



एक कथा अशी सांगितली जाते, की प्रत्यक्ष देवाधिदेवही ज्याला भिऊन होते, अशा शनीदेवांची दृष्टी एकदा हनुमानजींकडे वळली व त्याने वज्रदेही हनुमानजींच्या मस्तकावर आरोहण केले. शनीदेवांच्या अहंकाराचा नाश करण्याच्या हेतूने हनुमानजींनी वानरचेष्टा सुरू केल्या. त्याने पर्वत, झाडे उपटून शनीदेवांच्या डोक्यावर आपटण्यास सुरूवात केली. त्यामुळे शनी जेरीस आला व त्याने हनुमानजींची क्षमा मागितली. हनुमानजींनी त्यांना काही अटींवर मुक्त केले. तेव्हा शनीदेवांनी तेल, शनिवार, उडीद, रुई या आपल्या गोष्टी हनुमानजींना दिल्या. त्यांच्या उपासकांना पीडा न देण्याचे मान्य केले आणि शनीदेव व हनुमानजींची मैत्री झाली.

शनी व हनुमानजींबद्दल दुसरीही एक कथा सांगितली जाते. एकदा हनुमानजी सागरतटावर रामचिंतनात मग्न असलेला पाहून तेथून जाणाऱ्या शनीदेवांनी त्यांच्या राशीला जायचे ठरविले. हनुमानजींनी त्यांची खूप समजूत घातली, परंतु शनीदेवांनी ऐकले नाही. त्यांनी हनुमानजींना त्यांचे हात धरून ओढले, तेव्हा क्रोधित झालेल्या हनुमानजींनी आपले पुच्छ खूप वाढवून शनीदेवांना पायापासून गळ्यापर्यंत गुंडाळले व ते रामसेतूकडे जोरात पळत गेले. तेव्हा शनीदेवही त्यांच्याबरोबर आपटत-आपटत गेले. त्याचे सर्वांग ठेचकाळले. शेवटी हनुमानजींनी त्यांना द्वंद्वयुद्धासाठी आव्हान देताच त्यांनी क्षमा मागितली. हनुमानजींच्या भक्तांच्या वाटेस जायचे नाही, या अटीवर त्यांनी शनीदेवांना क्षमा केली. म्हणून शनीदेवांची अवकृपा टाळण्यासाठी हनुमानजींची उपासना करतात. शनी अरिष्ट असेल, तर शनीदेवांच्या अनुकूलतेसाठी दर शनिवारी हनुमानजींची उपासना, पूजा करतात. उपवास करून हनुमानजींना तेल, रुईची माळ, उडीद वाहतात. हनुमानजींना अकरा प्रदक्षिणा घालतात.

शनीदेवांचे वलय हनुमानजींच्या पृच्छाप्रमाणे दिसते. आकाशातील शनीदेवांची उडी ही हनुमानजींप्रमाणेच फार मोठी आहे. अशा अनेक कारणांमुळे हनुमानजींची शनीदेवांच्या ठिकाणी धारणा केली जाते.

शक्ती, मुक्ती, वैराग्य आणि मोक्ष यांचे दाता शनीदेव आणि हनुमानजी आहेत. पिंडदृष्टीने विचार करता दोघांचे जे वाततत्त्व तेच शरीरास कारक आणि घातक मानले जाते. शनीदेव आणि हनुमानजी ही बरीचशी समान दैवते आहेत. जे लोक हनुमानजींची उपासना करतील, हनुमानजींना प्रदक्षिणा घालतील, त्यांना शनिपीडेचा त्रास होणार नाही, अशी भक्तांची दृढ श्रद्धा आहे.

# भारतातील १० अविश्वसनीय शनी मंदिरे





१) शनि शिंगणापूर, महाराष्ट्र



२) शनिधाम मंदिर, नवी दिल्ली



३) शनीश्वर भगवान मंदिर, तमिळनाडू




४) शनिचरा, मध्य प्रदेश



५) बननांजे श्री शनी क्षेत्र, कर्नाटक




६) येरदनूर शनी मंदिर, तेलंगणा



७) शनी देवालय, महाराष्ट्र



८) शनिश्वर क्षेत्रम, केरळ



९) शनी महात्मा मंदिर, कर्नाटक



१०) शनी मंदिर, मध्य प्रदेश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भगवान शनीदेव हे शिस्तबद्ध वर्तन, कठोर परिश्रम आणि कर्माशी संबंधित देवता मानले जातात. हिंदू पौराणिक कथांनुसार ते सूर्यदेव आणि छायादेवी यांचे पुत्र असल्याने त्यांना रविपुत्र किंवा छायापुत्र असेही म्हटले जाते. शिवाय हिंदू ज्योतिषशास्त्रानुसार शनीदेव हे नवग्रहांपैकी एक आहेत.

हिंदू धर्मग्रंथांनुसार भगवान शनी हे सावळे असून त्यांना चार हात आहेत. ज्यांच्या हातात धनुष्य, बाण, त्रिशूळ आणि कुऱ्हाड आहे. ते कावळ्याला आपले वाहन मानतात. काही ग्रंथांमध्ये ते रथ चालवत असल्याचे आणि ते जिथे-जिथे जातात तिथे कावळा त्यांच्यामागे येत असल्याचे वर्णन आहे.

देशभरात या देवाला समर्पित विविध मंदिरे आहेत.

### १) शनि शिंगणापूर, महाराष्ट्र

हे मंदिर देशातील देवाला समर्पित असलेले सर्वांत मोठे तीर्थक्षेत्र असून ते नेवासा तालुक्यात आहे. या मंदिराला छत किंवा भिंती नाहीत, हे त्याचे वैशिष्ट्य आहे. देवाला पाच फूट उंच असलेल्या एका काळ्या दगडाच्या रूपात दर्शविले जाते, जो 'सोनाई' नावाच्या चौथऱ्यावर ठेवलेला आहे . असे मानले जाते, की गावकऱ्यांना नदीत एक काळी शिळा तरंगताना आढळली आणि त्यातून रक्त वाहत होते. देव गावाच्या प्रमुखाला स्वप्नात प्रकट झाला आणि त्याने सांगितले, की ती शिळा म्हणजे त्याचेच रूप आहे. त्याने प्रमुखाला ती शिळा गावाच्या मध्यभागी ठेवण्याची सूचना दिली.

### २) शनिधाम मंदिर, नवी दिल्ली

राजधानीतील या देवस्थानात नैसर्गिक खडकापासून बनविलेली शनिदेवांची मूर्ती आहे. २१ फूट उंच असलेली ही मूर्ती जगातील देवाची सर्वांत उंच मूर्ती आहे. भक्तांचा असा विश्वास आहे, की या मंदिरात देवतेची प्रार्थना केल्याने त्यांना त्यांच्या मार्गातील कोणताही अडथळा किंवा अडचण दूर करण्यास मदत होईल. असेही म्हटले जाते, की आजाराने त्रस्त असलेली व्यक्ती अत्यंत श्रद्धेने या देवस्थानाच्या आवारात प्रवेश केल्यावर त्या आजारातून बरी होते.

### ३) शनीश्वर भगवान मंदिर, तमिळनाडू

तिरुनल्लूर येथील हे मंदिर भारतातील प्रमुख नवग्रह मंदिरांपैकी एक मानले जाते. देवाच्या भक्तांचा असा विश्वास आहे, की येथे देवाची प्रार्थना केल्याने त्यांच्यावरील शनिदोषाचा प्रभाव तसेच दुर्दैव आणि संकटे कमी होतात, तर त्यांच्या कुंडलीतील शनीचे शुभ प्रभाव वाढतात. असे म्हटले जाते, की मंदिर परिसरात शनिदेवांनी आपली शक्ती भगवान शिवजींकडे गमावली. भक्तांचा असा विश्वास आहे, की नालन तीर्थम या पवित्र तलावात स्नान केल्याने त्यांना मागील कर्मांमुळे आलेल्या दुर्दैव आणि त्रासांपासून मुक्ती मिळते.

### ४) शनिचरा, मध्य प्रदेश

हे मंदिर देशातील देवाला समर्पित असलेल्या सर्वांत जुन्या मंदिरांपैकी एक मानले जाते. असे मानले जाते, की खूप पूर्वी ज्या ठिकाणी ही मूर्ती सध्या स्थापित आहे, नेमक्या त्याच ठिकाणी पडलेल्या एका उल्कापिंडापासून येथील शनीची मूर्ती तयार झाली. ही मूर्ती एका टेकडीच्या माथ्यावर आहे आणि असे म्हटले जाते, की भगवान हनुमानजींनी ती या ठिकाणी स्थापित केली, जेणेकरून शनीदेवांची दृष्टी लंकेवर स्थिरावेल आणि ते तिला जाळून राख करू शकतील. आपल्यावर होणाऱ्या वाईट परिणामांपासून मुक्ती मिळविण्यासाठी भाविकांची या मंदिरात मोठी गर्दी असते.

### ५) बननांजे श्री शनी क्षेत्र, कर्नाटक

या मंदिरात भगवान शनी यांची एक अतिशय उंच अखंड मूर्ती आहे, जी सर्वांना दिसावी म्हणून दोन पायऱ्यांच्या चौथऱ्यावर स्थापित केली आहे. हे मंदिर उडुपी जिल्ह्यातील सुप्रसिद्ध श्रीकृष्ण मंदिरापासून फक्त काही किलोमीटर अंतरावर आहे. येथे देवाला तैलाभिषेक हा प्रमुख नैवेद्य अर्पण केला जातो. भक्त येथे देवाचा आशीर्वाद घेण्यासाठी येतात. जेणेकरून त्यांना आव्हानांवर मात करण्यास आणि अडथळ्यांवर विजय मिळविण्यास मदत होईल.

### ६) येरदनूर शनी मंदिर, तेलंगणा

मेडक जिल्ह्यात असलेल्या या देवस्थानात दोन फूट उंच तळघरावर काळ्या अखंड शिळेत कोरलेली भगवान शनीदेवांची २० फूट उंच मूर्ती आहे. केवळ मूर्तीचेच वजन सुमारे ९ टन आहे. आपल्या कुंडलीतील शनीदेवांच्या अशुभ प्रभावांपासून मुक्ती मिळविण्यासाठी भाविक मोठ्या संख्येने या मंदिरात येतात. येथे पाळल्या जाणाऱ्या सर्वांत सामान्य विधींपैकी एक म्हणजे मोहरी किंवा तिळाच्या तेलाने दिवे लावणे.

### ७) शनी देवालय, महाराष्ट्र

मुंबईतील देवनार येथील हे मंदिर देवाच्या भक्तांमध्ये खूप लोकप्रिय आहे आणि याला अनेकदा सनेश्वराचे मंदिर म्हणून ओळखले जाते. भक्त काळ्या जादूटोण्याशी आणि त्यापासून मुक्ती मिळविण्याशी संबंधित समस्यांवर उपाय शोधण्यासाठी या देवस्थानाला भेट देतात. त्यांचा असा विश्वास आहे, की प्रामाणिक प्रार्थनेने देव त्यांना अडथळ्यांपासून मुक्त जीवन जगण्यास मदत करतात.

### ८) शनिश्वर क्षेत्रम, केरळ

हे मंदिर कोट्टायम जिल्ह्यात आहे. हे मंदिर इतर शनिदेवतांपेक्षा वेगळे आहे. कारण येथील शनीदेवांची मूर्ती एका आशीर्वाद देणाऱ्या देवाच्या रूपात दर्शविली जाते. या मंदिरातील देव आपल्या समस्या घेऊन त्यांच्याकडे येणाऱ्यांना मदतीचा हात देतात, अशी श्रद्धा आहे.

### ९) शनी महात्मा मंदिर, कर्नाटक

चिक्का मधुरे जिल्ह्यातील हे मंदिर या भागातील एका स्थानिक शेतकऱ्याने बांधले असल्याचे मानले जाते. शनिवारी, विशेषतः हिंदू श्रावण महिन्यात या मंदिरात भाविकांची मोठी गर्दी असते. त्यांचा असा विश्वास आहे, की येथे देवाची पूजा केल्याने किंवा विशेष पूजा अर्पण केल्याने पंचम किंवा अष्टम शनीच्या नकारात्मक प्रभावात घट होते किंवा ते पूर्णपणे मुक्त होतात. भाविक मंदिरासमोरील अग्नीकुंडात तिळाच्या तेलात बुडवलेल्या काळ्या कापडाच्या लहान तुकड्यात काळे तीळ टाकतात.

### १०) शनी मंदिर, मध्य प्रदेश

इंदूरमधील हे मंदिर इतर बहुतेक शनी मंदिरांपेक्षा वेगळे आहे, कारण येथे शनी-शनी शृंगार म्हणून शेंदूर धारण करतो. शिवाय इतर ठिकाणी जेथे शनी काळ्या वस्त्रात दाखविला जातो त्याच्या विपरीत येथील मूर्तीला रंगीबेरंगी वस्त्रे परिधान केलेली असून ती मुकुट आणि दागिन्यांनी सुशोभित आहे. स्वयंभू मूर्तीचा अभिषेक पारंपरिक तिळाच्या तेलाऐवजी दूध आणि पाण्याने केला जातो. देवांची मनापासून प्रार्थना केल्याने भक्तांना शनीदेव संबंधित समस्यांपासून दिलासा मिळतो.

भक्तगण विशेषतः शनिवारी शनी मंदिरांना भेट देतात. जेणेकरून त्यांना न्यायासाठी आणि त्यांच्या जीवनातील वैयक्तिक अडथळे किंवा वाईट गोष्टी दूर करण्यासाठी देवांचा आशीर्वाद मिळावा. ते कावळ्यांना खाऊ घालतात आणि पिंपळाच्या झाडांची पूजा करतात. कारण ती देवांची निवासस्थाने मानली जातात. भक्तगण देवांकडे थेट पाहून त्यांच्यासमोर उभे राहून किंवा त्यांच्या मंदिरांना भेट देताना त्यांच्याशी नजरानजर करत नाहीत. याचे कारण असे मानले जाते, की शनीदेवांना त्यांच्या पत्नीने शाप दिला आहे, की ते ज्याच्यावर आपली नजर टातील त्याला इजा पोहोचेल.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)